फोन नं. (02164) 272414,
8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

विद्यानगर, कराड पिन - 415124 जि. सातारा

जा.क्र.शाअमक/ईबीसीएसईबीसीशिष्यवृत्ती/२०२६/ २५६१ दिनांक :- - 3 NOV 2025

सूचना अत्यंत महत्वाची

विषय — शै.वर्ष २०२६-२७ मधील EWS, EBC, SEBC **प्रवर्गातील** स्कॉलरशीप करीता पात्र असलेल्या विदयार्थ्यांनी ऑनलाईन महाआयडी (Registration)२.० या वेबसाईटवर काढून ऑनलाईन फॉर्म भरणेबाबत.

संदर्भ :- **तंत्रशिक्षण्** संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/ ५८५ दि.१९/१०/२०२६.

संस्थेतील प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ तसेच एमसीए शाखेतील सर्व विदयार्थ्यांना सूचित करण्यात येते की, शैक्षणीक वर्ष २०२६-२७ वर्षात २.० हे महाडीबीटी पोर्टल कार्यान्वित करणेत आलेले आहे. तरी संस्थेतील शैक्षणीक वर्ष २०२६-२०२७ मधील EWS, EBC, SEBC **प्रवर्गातील** स्कॉलरशीप करीता पात्र असलेल्या विदयार्थ्यांनी https://mahadbt२.maharashtra.gov.in या **संकेतस्थळावरुन** आपला महाआयडी Create करावा. विभाजीत झालेल्या संबंधित योजनांतर्गत नवीन/नुतनीकरणाचे अर्जासाठी लागू प्रवर्ग व मुलां-मुलींचा तपशील खालीलप्रमाणे आहे. त्यानुसार ऑनलाईन फॉर्म भरावयाचे आहेत.

अ.क्र.	योजनेचे नाव	प्रवर्ग /उत्पन्न मर्यादा	लिंग व लाभ
१	राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण **शुल्क शिष्यवृत्ती (तंत्रशिक्षण)**	**खुला(ईबीसी/ईडब्ल्युएस)** (उत्पन्न मर्यादा ८ लाखपर्यंत)	मुले (शै.शुल्काच्या ५० टक्के लाभ)
२	राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण **शुल्क शिष्यवृत्ती एसईबीसी (तंत्रशिक्षण)**	**एसईबीसी** (उत्पन्न मर्यादा ८ लाखपर्यंत)	१)मुले -(शै.शुल्काच्या ५० टक्के लाभ) २)मुली - -(शै.शुल्काच्या १०० टक्के लाभ)
३	मुलींना मोफत व्यावसायीक शिक्षण योजना **(तंत्रशिक्षण)**	**खुला(ईबीसी/ईडब्ल्युएस)** (उत्पन्न मर्यादा ८ लाखपर्यंत)	मुली-(शै.शुल्काच्या१०० टक्के लाभ)
४	डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना **(तंत्रशिक्षण)**	**खुला(ईबीसी/ईडब्ल्युएस)** १.पालक अल्पभूधारक किंवा नोंदणीकृत मजूर २.(उत्पन्न मर्यादा १ लाखपर्यंत) ३. (उत्पन्न मर्यादा १ लाखापुढे ते ८ लाखपर्यंत)	१)सर्व पात्र मुले/मुली २)सर्व पात्र मुले/मुली ३)५०० पर्यत मर्यादित संच (खुला व एसईबीसी **प्रवर्ग**)- (३३ टक्के महिला करीता राखीव व **अभ्यासक्रम** निहाय गुणवत्तेनुसार)

५	डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना (तंत्रशिक्षण)	**एसईबीसी** १.पालक अल्पभूधारक किंवा नोंदणीकृत मजूर २. (उत्पन्न मर्यादा १ लाखपर्यंत) ३. (उत्पन्न मर्यादा १ लाखापुढे ते ८ लाखपर्यंत)	१)सर्व पात्र मुले/मुली २)सर्व पात्र मुले/मुली ३)५०० पर्यत मर्यादित संच (खुला व एसईबीसी प्रवर्ग)- (३३ टक्के महिला करीता राखीव व अभ्यासक्रम निहाय गुणवत्तेनुसार)
६	उच्च व्यावसायीक अभ्यासक्रमास शिक्षण घेणारे विदयार्थी	**महाराष्ट्रातील मुस्लिम, बौध्द ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन आणि ज्यू अल्पसंख्याक विदयार्थी** (उत्पन्न मर्यादा ८ लाखपर्यंत) सदर विदयार्थ्याने माध्यमिक शालांत परिक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी.	प्रत्यक्ष वार्षिक शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क किंवा रुपये ५०,००० यापैकी जी **रक्कम** कमी असेल ती **रक्कम**

वरील नमूद केलेल्या वर्गीकरणानुसार पात्र विदयार्थ्यानी वरील **संकेतस्थळावर फॉर्म भरावयाचा आहे. संस्थास्तरावर (Against Cap) मधून ज्या विदयार्थ्याचा प्रवेश झाला आहे अशा विदयार्थ्यानी वरील प्रवर्गाकरीता फॉर्म भरणेत येवू नये**. ज्या विदयार्थ्यानी प्रवेशावेळी फी सवलत घेतली आहे अशा सर्व वरील नमूद प्रवर्गातील विदयार्थ्यानी फॉर्म भरावयाचे आहेत. अंतिम दिनांकाची वाट न बघता विदयार्थ्यानी अचूक फॉर्म भरुन संस्थेस पुढील कार्यवाहीसाठी पाठवावयाचे आहेत. विदयार्थ्यांनी विहीत वेळेत फॉर्म न भरलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी विदयार्थ्याची राहील याची नोंद घ्यावी.

(टिपः- अधिक माहिती साठी विद्यार्थ्यानी वरील संकेत स्थळावरील डॅश बोर्ड पहावा.)

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,कराड

प्रत – १.सर्व सूचना फलकांवर लावणेसाठी.
२. संस्थेच्या संकेत स्थळावरती. (अपलोड करण्यासाठी)